उच्च माध्यमिक वर्गांना (माध्यमिक शाळेस व वरिष्ठ महाविद्यालयांस जोडलेल्या/स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालयांस जोडलेल्या) शिकविणाऱ्या शिक्षकांना त्रि-स्तरीय वेतनश्रेणी. निवडश्रेणीसाठी विहित अर्हतेत भर घालणे – संगणक विषयांतील प्रशिक्षणाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक – एच.एस.सी. १३०१/(४४५/०१) / उमाशि – १
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक – १४ नोव्हेंबर, २००३

वाचावे – १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एच.एस.सी.१३००/(२८०३/२०००), / उमाशि – १, दिनांक ३ जून, २०००.

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एच.एस.सी. १३०१/(४४५/०१) / उमाशि – १, दिनांक २३ नोव्हेंबर, २००१.

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एच. एस. सी. १३०१/२५१-अ/०१) दिनांक ३० ऑक्टोबर, २००२.

<u>प्रस्तावना –</u> राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमधील वर्गांना ( माध्यमिक शाळेस अथवा वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेल्या/ स्वतंत्र कनिष्ट महाविद्यालय) शिकविणाऱ्या शिक्षकांना सुधारीत त्रिस्तरीय वेतनश्रेणी शासनाच्या दिनांक ३ जून, २००० च्या आदेशान्वये लागू करण्यात आली आहे. सदर निर्णयातील तरतूदीनुसार निवडश्रेणीस पात्र होण्यासाठी एम. फील अथवा एम. एड. अशी अर्हता विहित करण्यात आली आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००१ च्या शासन निर्णयान्वये एम. फील अथवा एम. एड. ही अर्हता अथवा शासन विहित करील अशी संगणक विषयातील पदवी/ पदविका अशी अर्हता विहित करण्यात आली आहे. दिनांक ३० ऑक्टोबर २००२ च्या शासन निर्णयानुसार एम. एड. वा एम. फील. अथवा पी. एच. डी. अशी अर्हता प्राप्त करणाऱ्यांनादेखील निवड श्रेणीसाठी पात्र होण्यास ग्राह्य धरण्यांत येईल अशा प्रकारचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापि संगणक विषयातील कोणती पदवी, पदविका असावी हे शासनाने विहित केलेले नव्हते. ही बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय – उच्च माध्यमिक शिक्षकांना निवडश्रेणीस पात्र होण्यासाठी संगणक विषयातील महाराष्ट्र स्टेट अडव्हान्स सर्टिफिकेट कोर्स इन इनफर्मेशन टेक्नॉलॉजी (Maharashtra State Advance Certificate Course In Information Technology) हा प्रत्येक किमान १४४ तासांचा तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रम नेहमीच्या विहित शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त पूर्ण करणाऱ्या उच्च माध्यमिक शिक्षकांना पात्र ठरविण्यास शासन मान्यता देत आहे. या उच्च माध्यमिक शिक्षकांना निवड श्रेणी प्राप्त करण्यासाठी एम. एड. अथवा एम. फील. अथवा पी. एच. डी. अथवा संगणक विषयातील (M.S.A.C.I.T.) अभ्यासक्रम पूर्ण केला आहे व ज्या उच्च माध्यमिक शिक्षकांची सेवा २४ वर्षे वा त्याहून अधिक झालेली आहे अशा शिक्षकांना शासनाच्या दिनांक १३ मे, १९९९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक – ९.२ (ब) नुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी प्रस्तावित केलेला निवड श्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक आहे.

शासनाने शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी संगणक प्रशिक्षणासाठी ज्या संस्थांना मान्यता दिलेली आहे त्या संस्थांमार्फत उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना संगणक विषयातील (M.S.A.C.I.T.) अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.

निवडश्रेणी प्राप्त शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या आयोजनाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे व शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची संयुक्तपणे राहिल.

शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रशासकीय व व्यवस्थापकीय कामे करावयाची असून प्रशिक्षणाची आर्थिक जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांची राहिल. निवडश्रेणी प्रशिक्षणाबाबतची आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही त्यांनी आपल्या स्तरावरुन करावी.

वरील आदेश सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणण्यांत यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भो. गो. गोदोळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, पुणे.
३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर.
४) सर्व शिक्षणअधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद.